२१



शाळेचे नांव – महात्मा ज्योतीराव फुले हायस्कूल (मुलांचे)

शाळेस मान्यता मिळण्यासाठी, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 यांच्या अनुसूचीमध्ये विहित केलेली मानके व प्रमाणके यांच्या अनुपालनासंबंधात

# प्रतिज्ञापत्र

* प्रमाणित करण्यात येते की, शाळेने या अर्जासोबत ज़िल्हा शिक्षण माहिती पध्दतीनुसार आधार सामुग्रीच्या नमुन्यात देखील माहिती सादर केली आहे.
* प्रमाणित करण्यात येते की, जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी वेळोंवेळी देण्यास भाग पाडलेले असे अहवाल व माहिती सादर करण्याची शाळा मान्यतेच्या शर्तीची सातत्याने परिपूर्ती करण्याबाबत व शाळेच्या कामकाजातील त्रूटी दुर करण्याबाबत खातरजमा करण्यासाठी समुचित प्राधिकरण किंवा जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी दिलेल्या अशा सूचनांचे पालन करण्याची हमी शाळा देत आहे.
* प्रमाणित करण्यात येते की, समुचित प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-याला तपासणीसाठी शाळा खुली असेल.
* प्रमाणित करण्यात येते की, या अधिनियमाच्या अंमलबजावणी संदर्भातील शाळेचे सर्व अभिलेखे जिल्हा शिक्षण प्राधिका-याने वा समुचित प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-यास तपासणीसाठी केव्हाही उपलब्ध असतील आणि केंद्र सरकार/राज्य शासन/स्थानिक संस्था किंवा संसद/राज्य विधान सभा/पंचायत किंवा यथास्थिती महानगरपालिका यांच्या प्रती असलेली तीची किंवा त्यांची बंधने पुर्ण करणारे प्रशासन यांना सहाय्यभूत ठरण्यासाठी आवश्यक असेल अशी सर्व माहिती शाळा पुरविल.

GENERAL SECRETARY
D.J.M. SOCIETY, POONA
896, Nana Peth, Poona-2.

शाळा व्यवस्थापन समिती.

स्थळ – पुणे
दिनांक